##### ////आतील पानात वाचा

- असंघटित कामगारांचा आधारवड हरपला !
- राजधानी दिल्लीत होणार ‘शंखनाद’ !
- अवैधरित्या गोवंश वाहतुक २० जनावरांची सुटका ; अंदाजे २४ लाखांचा मुद्देमाल जप्त...

दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ११७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१० डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मराठवाड्यातील महत्त्वाच्या जिल्ह्यात म्हाडाची ५००० घरांची लॉटरी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, छ. संभाजीनगर :** शहराचा वाढता विस्तार व घरांची वाढती मागणी लक्षात घेऊन छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने (म्हाडा) आगामी पाच वर्षांचा आराखडा तयार करून रास्त दरांत दर्जे दार पाच हजार घरे बांधण्याचे निश्चित केले आहे.

जनसामान्यांना रास्त दरांत दर्जे दार घरांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने म्हाडा (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ) ही गृहनिर्माण सुविधा देणारी यंत्रणा पाच डिसेंबर १९७७ रोजी स्थापन केली. छत्रपती संभाजीनगर म्हाडा मंडळाच्या कार्यक्षेत्रात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचा समावेश आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट; तसेच मध्यम व उच्च उत्पन्न गट या उत्पन्नांवर आधारित सार्वजनिक गृहनिर्माण योजनेंतर्गत परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे 'म्हाडा'चे ध्येय आहे.

*** झपाट्याने विस्तार...**

दरम्यान, पर्यटननगरी व म राठवाड्यातील सर्वांत मोठे महानगर असलेले छत्रपती संभाजीनगर गेल्या काही वर्षांत झपाट्याने विस्तारत आहे. पर्यटन उद्योगाबरोबरच शेंद्रा, वाळूज, डीएमआयसी या औद्योगिक वसाहती, येथील नामांकित कंपन्या व होणारी म ोठी गुंतवणूक या कारणांनी रोजगारांच्या संधी वाढल्या आहेत; तसेच विविध शैक्षणिक संस्था, आरोग्य सुविधा आदी कारणांमुळे शहराच्या चारही बाजूंनी नागरी वसाहत वाढत आहे. घरांना होणारी मोठी मागणी लक्षात घेऊन म्हाडानेदेखील परवडणारी घरे अधिक बांधण्यावर भर दिल्याचे चित्र आहे.

त्याचाच भाग म्हणून, पंतप्रधान घरकुल योजनेंतर्गत (पीएमएवाय) नक्षत्रवाडी येथील गट नंबर नऊमध्ये ६.४ हेक्टरवर म्हाडाने एक हजार ५६ सदनिका उभारणीचा गृहप्रकल्प हाती घेतला असून, या घरांची सोडत नुकतीच काढण्यात आली. यासह २० टक्के सर्वसमावेशक योजनेंतर्गत २१ सदनिका, १८ भूखंड; तसेच चिकलठाणा परिसरात १५४ सदनिकांसाठी सोडत करण्यात आली. ७५९ घरे अद्यापही उपलब्ध असून, त्यासाठी लवकरच सोडत काढली जाईल. घरांसाठी मिळणारा प्रतिसाद पाहता पुढील पाच वर्षांत पाच हजार घरे उभारण्याचे नियोजन म्हाडाने हाती घेतल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय नवले यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले.




*** कुठे होणार प्रकल्प?**

नक्षत्रवाडी परिसरातील म्हाडाची १०.५६ हेक्टर जमीन आहे. यासह नक्षत्रवाडी परिसरातील सर्व्हे क्रमांक नऊमध्ये ५.२ हेक्टर; तसेच लगतच दोन हेक्टर जमीन असून, गारखेडा परिसरात सुमारे अर्धा एकर जागा उपलब्ध आहे. देवळाई परिसरातही दहा हेक्टर जागा म्हाडाच्या मालकीची असून, या जागांवर टप्प्याटप्प्याने दर्जे दार व परवडणारी घरे उभारण्यात येतील, अशी माहिती कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेगव्हाणकर यांनी 'मटा'शी बोलताना व्यक्त केली.

## वाद सोडविण्यास गेलेल्या पोलीस पाटलास जातीवाचक शिवीगाळ व मारहाण

### सहा आरोपींवर ॲट्रॉसिटीसह गुन्हा दाखल !



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** सरोळेथडी (ता. निफाड) येथे वाद मिटविण्यास गेलेल्या पोलिस पाटलास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी भाऊसाहेब खंडू बर्डे (वय ३९, रा. सरोळेथडी) हे ४ डिसेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास संदीप नागरे यांच्या दुकानासमोरील जागेत रविंद्र भिका पिपळे व निखील नाईक यांच्यातील वाद सोडविण्यास गेले असता ही घटना घडली.

यावेळी आरोपी किरण रतन नागरे, गणेश मधुकर नागरे, सचिन रमेश नागरे, प्रकाश चिंधा नागरे, कैलास शिवाजी आव्हाड आणि गणेश निवृत्ती नागरे यांनी कुरापत काढून फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करत चल निघ, तू कसला पाटील? गावचे पाटील आम्ही आहोत असे म्हणत अपमानित केले. दरम्यान आरोपी गणेश नागरे याने हातातील लाकडी काठीने फिर्यादीस मारहाण केली. फिर्यादीचे वडील, आई आणि भाऊ भांडण सोडविण्यास धावून आले असता आरोपींनी त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ करत हाताच्या चापटीसह लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

या फिर्यादीवरून गु.र.न. २७९/२०२५ नुसार अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ (सुधारित २०१५) कलम ३(१)(आर)(एस), ३(२)(वी.ए) तसेच भा.दं.वि. कलम १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास निफाड उपविभागीय पोलीस अधिकारी के.के. पाटील करत आहेत.

## भारत निवडणूक आयोगाचे चिन्ह वापरू नका : मुख्य निवडणूक अधिकारी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांकडून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाशी संबंधित चिन्हे, इमारतींची दृश्ये किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या छायाचित्रांचा वापर केल्याची काही प्रकरणे दिसून आली आहेत. यातील संभ्रम दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी प्रसारमाध्यमांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सांगितले की, संसदीय, विधानमंडळ तसेच राष्ट्रपती- उपराष्ट्रपती निवडणुका घेण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाची असून राज्यात या कामकाजासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. सध्या महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय अधिकारी एस.चोक्कलिंगम कार्यरत आहेत. दुसरीकडे, संविधानातील अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचालन, निर्देशन आणि नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयुक्त पदावर निवृत्त प्रधान सचिव दिनेश वाघमारे कार्यरत आहेत. दोन्ही आयोगांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी व स्वतंत्र असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह, अधिकारी, इमारती अथवा तत्सम दृश्यांचा वापर करणे चुकीचे असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

तसेच, राज्य निवडणूक आयोगाशी संबंधित बातम्यांमध्ये झालेल्या अशा चुकांची तातडीने दुरुस्ती करून संबंधित व्हिडिओ समाजमाध्यमांतून हटवावेत, असे आवाहनही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रसारमाध्यमांना करण्यात आले आहे.

## खुल्या राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धेत मंद्रूपच्या खेळाडूंचे घवघवीत यश



### २८ सुवर्ण, ८ रोप्य व ४ कांस्यपदकांचा समावेश...

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०९, सोलापूर :** बारामती येथे झालेल्या खुल्या राज्यस्तरीय तायक्कान्दो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपच्या ४० खेळाडूंनी पदक पटकावले आहे. यामध्ये २८ सुवर्ण, ८ रौप्य व ४ कांस्यपदक पदकांचा सम ावेश आहे.या सुवर्णमय कामगिरीमुळे मंद्रूपचा डंका वाजला आहे.

बारामती येथे ७ डिसेंबर ही स्पर्धा झाल्या.या स्पर्धा इंग्लिश मेडीयम स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन बारामती यांनी खुल्या राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धेचे

आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूप च्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्या विविध गटामध्ये ४० खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. यात २८ सुवर्ण, ८ रौप्य व ४ कांस्यपदकांचा समावेश आहे. यामध्ये पोर्णिमा खंदारे, श्रावणी नंदुरे, सफीना शेख, श्रेया पवार, स्वप्नाली पवार, नंदिनी मुगळे, दिव्या पवार , आरोही कंदले, समृद्धी लोभे, हयाती पवार, वंश राठोड, अमन शेख, समर्थ चव्हाण, अभिजीत खरात, हर्ष सरवदे, अभिषेक वाले, अथर्व शिंगडगाव, संग्राम नवले, सुमेध पोतदार, वैभव घाले, आयुब शेख, मोहन चव्हाण, शुभम पवार, मोहन चव्हाण, सुवेध पोतदार, साक्षी खंदारे, आराध्या राठोड. रविराज कुसुरे

यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे तर क्रिशा पवार, आरोही भागवत, श्रावणी पवार, प्राजक्ता पांढरे, सुमया शेख, अबूबकर नदाफ, समर्थ चव्हाण, प्रेम चव्हाण यांनी रौप्य पदक मिळविले आहे. महासिध्द कुंभार,सार्थक पवार,

आरोही खंदारे , समर्थ चव्हाण, यांनी कांस्यपदक पटकावले आहे. या स्पर्धेमध्ये पुणे, सोलापूर, सांगली, बिड, व इतर जिल्ह्यातील खेळाडूंनी भाग घेतला होता. या सर्व यशस्वी खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमीचे अध्यक्ष प्रविण जोडमोटे, रेश्मा राठोड, सचिन कुंभार, दिपक धुळखेडे, सिद्धाराम विजापूरे, प्रिती राठोड यांनी अभिनंदन केले आहे.

## सीएसएमटी ला शिवरायांचा पुतळा उभारणार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.९, मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा बसविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. लोकसभेतील एका लेखी उत्तरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या प्रस्तावाला नकार दर्शविल्याचा उल्लेख काही सदस्यांनी केला होता. या पार्श्वभूम ीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे उत्तर जुना आराखडा लक्षात घेऊन लोकसभेत देण्यात आल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक हे आपले अभिमानाचे स्थान आहे. याठिकाणी पुतळा उभारण्याची मागणी पूर्वीही करण्यात आली होती. त्यावेळी या संदर्भातील आराखडा तयार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र अलीकडे लोकसभेत आलेले उत्तर हे जुन्या आराखड्याशी संबंधित असल्याचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी स्वतः स्पष्ट केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, नवीन आराखड्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्याचा प्रस्ताव असून त्याच्या अंतिम मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. नवीन आराखडा मंजूर झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर अत्यंत भव्य असा पुतळा उभारला जाणार आहे.

## अटल वन उद्यान परिसरासाठी वरदान : आ. काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९,पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील सुपे येथे वन विभागातर्फे उभारण्यात येणाऱ्या अटल वन उद्यानाच्या विकासकामाचे भूमिपूजन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते झाले. सुपे परिसराला पर्यटनाच्या नकाशावर अग्रस्थानी आणणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि वन विभागाकडून ४ कोटी १६ लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून प्रकल्पाच्या प्रारंभिक टप्प्यातील कामांना या भूमिपूजनाच्या म ाध्यमातून वेग येणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

या प्रसंगी माजी सभापती दीपक पवार, जयवंत पवार, मा. उपसरपंच सागर मैड, दत्तात्रय पवार, हनुमान पवार, सुनील पवार, भाऊ गवळी, कैलास दहिवाळ, माऊली पवार, बबन पवार, संतोष गायकवाड, दत्तात्रय टकले, मधुकर येणारे, अतुल वाढवणे, अनिल येणारे, परमोकर पवार, सुरेंद्र शिंदे, आनंदा पवार, सूरज पवार, निशाण वाजले, वन विभागाचे शेख साहेब, पठाण साहेब, सागर आढाव, अम ोल मैड आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार दाते म्हणाले की, तात्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सुपे परिसरात वन उद्यान निर्माण करण्याची म ागणी करण्यात आली होती. त्या मागणीची तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्रातील पायलट प्रकल्प म्हणून सुपे अटल वन उद्यानाची निवड करण्यात आली. या प्रकल्पाला मंजुरी मिळवून देण्यासाठी सहकार्य करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, वनमंत्री मुनगंटीवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आमदार दाते यांनी मनःपूर्वक आभार मानले.



> अटल वन उद्यान हा सुपे परिसराच्या सर्वांगीण विकासाचा नवा अध्याय ठरेल, पर्यटन, रोजगार व पर्यावरण संवर्धन या तिन्ही क्षेत्रांना चालना देणारा हा प्रकल्प ग्रामीण भागासाठी वरदान आहे, आमदार काशिनाथ दाते यांच्या सहकार्यामुळेच आज हा प्रकल्प मार्गी लागला असून याचा थेट फायदा स्थानिक नागरिकांना मिळणार आहे, विकासाच्या या ऐतिहासिक कार्याबद्दल आम्ही आमदार दाते सरांचे मनःपूर्वक आभार मानतो.
>
> **- सागर मैड, मा. उपसरपंच सुपा**

या भूमिपूजन सोहळ्यानंतर सुपे परिसरात उत्साहाचे वातावरण दिसून येत असून ग्रामस्थ व स्थानिक नेतृत्वाने प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारीही व्यक्त केली आहे. प्रकल्पातील विकास नियोजनामध्ये पर्यटकांसाठी सुविधा केंद्र,नैसर्गिक मार्ग, वन्यजीव माहिती केंद्र,वन संरक्षण जनजागृती उपक्रम,हरित क्षेत्र विकास यांचा समावेश असून प्रारंभिक कामे अल्पावधीतच पूर्ण होतील,असा विश्वास आमदार दाते यांनी व्यक्त केला.

अक्षराज







## अनागोंदीच्या नव्या नोंदी

प्रगत सुविधा आणि विकासाची फळे सामान्य नागरिकांसही सहजपणे चाखता यावी यासाठी कितीही नव्या योजना आणल्या, जनतेच्या मनात नवी स्वप्ने रुजविली तरी तसे प्रत्यक्षात येण्यासाठी या योजनांच्या अंमलबजावणीतील संबंधितांचे प्रामाणिक सहकार्य गरजेचे असते. या यंत्रणांनीच स्वप्नांवर पाणी फेरण्याचे काम सुरू केले, तर स्वप्नांचा चुराडा होण्यास वेळ लागत नाही. याचे बोलके वास्तव इंडिगो नावाच्या विमान कंपनीच्या धोरणामुळे सध्या सुरू असलेल्या अस्मानी संकटातून समोर येऊ लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून इंडिगो या विमानसेवेच्या धोरणातून उद्भवलेल्या संकटाचा फटका ज्यांना बसला, ते सगळेच विमान प्रवासी अतिश्रीमंत वर्गातील असतील असे नाही. अनेकांनी अत्यंतिक निकडीच्या गरजेपोटी या विमानसेवेची निवड केलेली असेल, काहींच्या भविष्यातील नव्या संधी या विमानसेवेवर अवलंबून असतील तर काहींच्या कौटुंबिक समस्यांचे निराकरण या सेवेमुळे सोपे होणार असेल, पण त्या सगळ्याच संधी, सेवांवर विमानसेवेच्या हेकट धोरणाने पाणी फेरले. या कंपनीच्या अनागोंदीने कळस गाठल्याने देशाच्या वेगवेगळ्या विमानतळ्यांवरून होणारी शेकडो विमाने रद्द झाली आणि पैसे मोजून प्रवासासाठी विमानतळांवर दाखल झालेल्या हजारो प्रवाशांची अभूतपूर्व परवड झाली. आर्थिक स्थैयांमुळे समाजात आता नवमध्यमवर्गाचा आणि नवश्रीमंतांचा उदय होत आहे. असा वर्ग निम्न मध्यमवर्गाच्या किंवा गरिबांच्या जगण्यापासून अंतर राखूनच असतो, त्यामुळे गरिबांना परवडणाऱ्या सामान्य सुविधादेखील कधीकधी पुरेशा नसल्यास त्याची कशी परवड होते, याचीही या वर्गास विशेष कल्पना नसते. इंडिगोच्या धोरण धांदलीमुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या खेळखंडोब्यामुळे नवश्रीमंत आणि नव्याने या स्तरात दाखल झालेल्या नव-मध्यम वर्गीयांस गरिबांची ती परवडही अनुभवास आली. वाहतूक व्यवसायात खाजगी क्षेत्राने पाय रोवण्यास सुरुवात केल्यापासून 'एसटी' सारखी गरिबांची जीवनवाहिनी काहीशी उपेक्षित होत गेली आणि गावोगावीच्या एसटी स्थानकांच्या अगोदरपासूनच्या अवकळेनेही कळस गाठला.

इंडिगोच्या अनागोंदीमुळे विमानतळावर रखडलेल्या हजारो प्रवाशांना त्या अवकळेचा अनुभव आला आहे. कोणत्याही सेवेच्या दर्जाचा एक स्तर राखला जाणे गरजेचे असते. विमानतळ, रेल्वेस्थानके, एसटीस्थानके यांचा स्तर त्या सेवांच्या दर्जानुसार सुधारित किंवा सुमार असतो असे मानले जाते. एसटी स्थानकांची अवकळा विमानतळांवर आली तर कसे होईल, याचा साक्षात अनुभव देऊन इंडिगोने प्रवाशांना एसटी स्थानकांच्या अवकळेचा अनुभव तर दिलाच, पण कधी ना कधी आपणासही आकाशात झेपावण्याची संधी मिळेल या प्रतीक्षेत असलेल्या सामान्यांच्या स्वप्नांनाही धक्कादायक अनुभव दिला, इंडिगो ही देशातील सर्वाधिक विमाने असलेली कंपनी आहे. वैमानिकांच्या सेवांसदर्भात सरकारने सर्वच विमान कंपन्यांना आखून दिलेल्या नियमांच्या अंमलबजावणीकडे केलेल्या दुर्लक्षाचा मोठा फटका हजारो प्रवाशांना बसल्यामुळे या कंपनीने सरकारला आव्हान देण्यासाठी सामान्यांना वेठीस धरले नाही ना, याची चौकशी व्हायला हवी; कारण या दुर्लक्षाचे कोणते परिणाम होतील हे न समजण्याएवढा दुधखुळेपणा कंपनीच्या व्यवस्थापनाकडे निश्चितच नसेल, त्यामुळे प्रवाशांना वेठीस धरल्यास सरकारवर दबाव येऊन नियम मागे घेतले जातील अशीही या कंपनीची अपेक्षा असावी, म्हणूनच ही अनागोंदी गंभीर ठरते आणि म्हणूनच त्याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.

# असंघटित कामगारांचा आधारवड हरपला !



असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी झटणारे ज्येष्ठ कामगार नेते, पुरोगामी चळवळीचे आधारवड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ बाबा आढाव यांचे सोमवारी ( दिनांक ८ डिसेंबर) रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले.

त्यांच्या निधनाने कष्टकरी, श्रमजीवी वर्गासाठी आयुष्य वेचणारे नेतृत्व हरपले. त्यांच्या निधनाने या वर्गाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. डॉ बाबा आढाव यांनी कष्टकरी, श्रमजीवी वर्गासाठी जितके कार्य केले तितके कार्य याआधी कोणीही केले नाही. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा वारसा सांगणाऱ्या बाबा आढाव यांचा जन्म १ जून १९३० रोजी पुण्यात झाला. ते नाना पेठेतील नामांकित आयुर्वेदिक डॉक्टर होते.

बाबा आढाव यांनी वयाच्या २३ व्या वर्षीच म्हणजे १९५३ सालीच सामाजिक चळवळीत भाग घ्यायला सुरुवात केली. त्यावेळेच्या तरुणांना समाजवादी विचारांची भुरळ पडली होती तशी भुरळ बाबा आढाव यांनाही पडली म्हणूनच त्यांनी समाजवादी पक्षात प्रवेश करून सामाजिक कार्यास सुरुवात केली. १९७० सालापर्यंत बाबा आढाव समाजवादी पक्षाबरोबर राहिले या काळात त्यांनी अनेक आंदोलन केले.

ते पुण्याचे नगरसेवकही होते. नाना पेठ हा शहरातील बाजार पेठेचा भाग असल्याने अनेक व्यवसायातील कामगार, हमाल तिथे येत असत त्यामुळे कामगारांना येणाऱ्या अडचणी बाबा आढावा यांच्या लक्षात येऊ लागल्या हमालांचे शोषण होऊनही त्यांना कुठलेही कायदेशीर संरक्षण नसल्याचे त्यांनी पाहिले. या गोष्टीचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. अखेर १९६६ साली त्यांनी आपला चांगला चाललेला डॉक्टरकीचा व्यवसाय सोडला आणि कामगारांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरवले. १९७० नंतर मात्र बाबा आढाव यांनी राजकारणातून फारकत घेऊन कष्टकरी श्रमजीवी वर्गासाठी अर्थात असंघटित वर्गासाठी काम करण्याचे ठरवले. या वर्गाला त्यांचे अधिकार आणि हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. नडलेल्या, नाकारलेल्या उपेक्षित घटकांपर्यंत स्वातंत्र्याचे नि सार्वभौम लाभ पोहचवण्याचे काम त्यांनी केले. हमालपंचायत, , रिक्षा पंचायत, मोलकरीण पंचायत, कागद - पत्रा - काच वेचक कष्टकरी पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, टेम्पो पंचायत अशा अनेक असंघटित कामगाराच्या संघटना त्यांनी बांधल्या. या संघटनांच्या माध्यमातून त्यांनी असंघटित कामगारांना न्याय, सन्मान आणि सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. हमाल पंचायतची स्थापना ही त्यांच्या कार्याचा महत्वाचा टप्पा ठरली. हमाल पंचायतीच्या माध्यमातून बाबा आढाव यांनी पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हमालांना संघटित केले. जातीय भेदभावा विरुद्ध लढण्यासाठी त्यांनी एक गाव एक पाणवठा या क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व केले आणि समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न त्यांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत सुरू ठेवला. महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळीत जवळपास पाच दशकांहून अधिक काळ बाबा आढाव यांचा सहभाग राहिला. बाबा आढावांच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे महत्त्वाचे वैशिष्टे म्हणजे त्यांना असणारे राजकीय व्यवहार्यतेचे भान. असंघटित कामगारांचे संघटन करताना शोषणाच्या कमी अधिक प्रमाणात लढत राहणे, असंघटितांसाठी लढताना शासनाशी आर्थिक मागण्या न करता स्वायत्तपणे सहकारी संस्थांमधून सामाजिक सुरक्षितता मिळवण्याचे प्रयत्न करणे आणि सामाजिक प्रबोधन घडवणे. संशोधन संस्थांचे सहाय्य घेऊनही संघर्षात्मक राजकारणाचे प्राधान्य कायम ठेवणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे पक्षीय राजकारणात सहभागी न होता देखील कळीच्या मुद्यावर राजकीय भूमिका घेण्याचे धाडस दाखवणे अशा सर्व पातळ्यांवर बाबा आढावांमध्ये व्यवहार्यतेचे भान स्पष्ट होत जाते. संघर्ष आणि प्रबोधन अशा दुहेरी मार्गांनी झालेली त्यांच्या नेतृत्वाची वाटचाल पुरोगामी राजकारणाचा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. बाबा आढाव यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील अढळ तारा निखळला. त्यांच्या निधनाने असंघटित कामगारांचा आधारवड हरपला. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# 'दूरध्वनी पुस्तिके'चे माहिती विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते प्रकाशन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या 'हिवाळी अधिवेशन २०२५ दूरध्वनी पुस्तिके'चे प्रकाशन माहिती विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. नागपूर येथे अधिवेशनाकरिता येणाऱ्या राजकीय प्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार व नागरिकांना संबंधित शासकीय यंत्रणेशी सुलभ आणि त्वरित संपर्क साधता यावा, या उद्देशाने ही विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात आली असून संबंधितांना ही उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते या दूरध्वनी पुस्तिकेच्या क्यू आर कोड चेही प्रकाशन करण्यात आले. या क्यू आर कोडमुळे संपूर्ण दूरध्वनी पुस्तिका आता डिजिटल स्वरूपात सहजपणे ऑनलाईन उपलब्ध झाली आहे, ज्यामुळे पुस्तिका छापाईसाठी लागणाऱ्या शासनाच्या निधीतही मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे.



**पुस्तिकेतील संपर्क माहितीचा तपशील :**

अधिवेशनाच्या काळात सुलभ समन्वयासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी ही दूरध्वनी पुस्तिका दोन भागांत विभागली आहे :

भाग-१ (राजकीय व व्यवस्थेशी संबंधित): यात प्रामुख्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे सदस्य, विधानमंडळाचे प्रमुख (अध्यक्ष, सभापती) यांची कार्यालये व निवासस्थाने यांचे संपर्क क्रमांक समाविष्ट आहेत. तसेच, विधान भवन, हैदराबाद हाऊस, रवी भवन आणि नाग भवन येथील तात्पुरत्या निवास व कार्यालयाच्या व्यवस्थापनाचे संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत. यासह, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचे संपर्क आणि नागपूर शहर परिसरातील वैद्यकीय सुविधा, पर्यटन स्थळे व परिवहन (रेल्वे, विमान वाहतूक) संबंधी माहितीही उपलब्ध आहे.

भाग-२ (शासकीय कार्यालये) : यात नागपूरमधील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस विभाग, न्याय व्यवस्था आणि विविध प्रशासकीय विभाग (सार्वजनिक बांधकाम, वित्त, जलसंपदा) व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा/एनआयटी) यांच्या कार्यालये व अधिकाऱ्यांचे विस्तृत संपर्क क्रमांक समाविष्ट आहेत. पुस्तिका प्रकाशन सोहळ्याला सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी उपसचिव अजय भोसले, कक्ष अधिकारी युवराज सोरेगावकर, माहिती विभागाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे, नागपूर- अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे व संचालक (वृत्त व जनसंपर्क) गोविंद अहंकारी, महासंचालक यांचे विशेष कार्य अधिकारी इरशाद बागवान व जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार हे उपस्थित होते.

## प्रतिनिधी

संसदभवन आपले
असते अमोल ठेवा
सर्वांअसे अभिमान
पावित्र्य राखून ठेवा

कामकाज असे हवे
सगळे करी वाहवा
चर्चा रे सकारात्मक
विचार झरा वहावा

वाद विवाद संपावा
पायंडा नवा पडावा
विधायक विधेयका
उगाविरोध सोडावा

रयतेचा नेत्यावरती
संपूर्ण विश्वास हवा
आपले ते प्रतिनिधी
नको केवळ ही हवा

बहिष्कार गोंधळांस
मिळो जरा विसावा
कायदा सु व्यवस्था
विश्वास बा बसावा

सत्ताधारी विरोधकां
दुरावा कधी नसावा
दोन्ही जनतेचे सेवक
लोकशाही रे विसावा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# राजधानी दिल्लीत होणार 'शंखनाद'!

बागेश्वर धामचे पिठाधीश्वर पंडित धीरेंद्र शास्त्री महाराज यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली ते वृंदावन 'सनातन हिंदू एकता पदयात्रा' गेल्याच महिन्यात संपन्न झाली. १० दिवस चाललेल्या पदयात्रेत देशाच्या कानाकोपऱ्यातून विविध संत-महंत, कथाकार, राजकीय नेतेमंडळी, सिनेकलाकार, गायक, संगीतकार यांसह लाखो भाविक सहभागी झाले होते. जात-पात, संघटना, संप्रदाय यांमध्ये अडकलेल्या हिंदूंना धर्माच्या आणि भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी संघटित करण्यासाठी राजधानी दिल्लीतून निघालेल्या या पदयात्रेने इतिहास घडवला. त्याच राजधानी दिल्लीत येत्या १३ डिसेंबरला 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'ला आरंभ होत असल्याचे वाचनात आले. १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत नवी दिल्लीतील भव्य दिव्य अशा 'भारत मंडपम'मध्ये हा सोहळा संपन्न होत आहे. तीन दिवसांच्या समारोहात श्रीराम जन्मभूमी न्यास कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्यासह देशातील शेकडो संत-महात्मे, प्रवचनकार हिंदुत्वनिष्ठ राजकीय नेते, केंद्रिय मंत्री, दिल्लीचे मुख्यमंत्री, देशाच्या संरक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण पदे भूषविणारे अधिकारी, ऐतिहासिक पुरुषांच्या कुळातील वंशज, राष्ट्र आणि धर्म यांसाठी भरीव कामगिरी करणाऱ्या संघटनांचे पदाधिकारी, कलाकार यांसह हजारो भाविक गण सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचे फलक आज दिल्लीत जागोजागी लागले आहेत. सनातन संस्थेच्या स्थापनेला २५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मे महिन्यात गोव्यात 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे सर्वप्रथम आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची आणि तो सोहळा जवळून पाहण्याची संधी मिळाली होती. अध्यात्म, संरक्षण आणि राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर, अधिकारी यांसह देश आणि विदेशातील ३० हजाराहून अधिक साधकगण या कार्यक्रमात सहभागी झाले होते. तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाने गोव्याला एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्यावेळी उपस्थित मान्यवरांनी अशा प्रकारचा महोत्सव राजधानी दिल्लीमध्ये घेण्याचा मानस व्यक्त केला आणि पुढील सातच महिन्यात 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन'च्या सहकार्याने 'सनातन संस्था' ३ दिवशीय सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव राजधानी दिल्लीत साजरा करणार आहे.




आजमितीला देश झपाट्याने प्रगती करत असला तरी नक्षलवाद, आतंकवाद, विविध प्रकारचे जिहाद देशाला पोखरू पाहत आहेत. नक्षलवाद आज केवळ घनदाट जंगलांपुरता मर्यादित राहिला नसून आता तो पांढरपेशी शहरातही लोकांमध्ये राहून विविध माध्यमांतून हातपाय पसरू लागला आहे. हिंदूंच्या प्रथा-परंपरांना, सण उत्सवांना अंधश्रद्धेचे लेबल लावून सामान्य नागरिकांचा बुद्धिभेद करत आहे, आतंकवाद हा केवळ अशिक्षितांचा राहिला नसून उच्चशिक्षित डॉक्टर्स, इंजिनिअर्स त्याला अधिक प्रभावी करण्यासाठी कार्यरत आहेत. कमी काळात देशाचे अधिकाधिक नुकसान करण्याच्या योजना यांच्या नापाक मेंदूतून आखल्या जात आहेत, लव्ह जिहाद, लँड जिहाद, थुंक जिहाद, हलाल जिहाद यांसारखे उदयास येणारे नवनवीन जिहाद हिंदूंसह अन्य पंथीयांच्या मुळावर उठले आहेत. सिनेमा, वेब सिरीज, शॉर्ट स्टोरीज, रिल्स आदींच्या माध्यमातून अश्लीलता पसरवणे, नात्यांमध्ये फूट पाडणे, पाश्चात्य विकृतीला, सूड भावनेला आणि हिंसेला प्रोत्साहन देणे अविरत सुरु आहे. लिव्ह इन रिलेशनशिप, विवाहबबाह्य संबंध, नाईट आउट, डिस्को, पब, मद्यपान, अमली पदार्थ, ऑनलाईन जुगार यांसारख्या बाबींना सामान्य करून त्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. अवास्तव मनोरंजन, मोबाईलवरील गेम्स, जुगार, विविध व्यसने यांमध्ये युवाशक्तीचा ऱ्हास होऊ लागला आहे. रामायण, महाभारत यांचा अभ्यास करून छत्रपती शिवाजी महाराज घडले, साधू संतांच्या आशिर्वादाने, जीवास जीव देणाऱ्या मूठभर मावळ्यांच्या साथीने आणि अचाट बुद्धिमत्ता आणि पराक्रम यांच्या बळावर महाराजांनी पाच पातशाह्यांना लोळवून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, कल्याणच्या सुभेदाराच्या सूनेमध्ये राजमाता जिजाऊंचे रूप पाहणाऱ्या छत्रपतींच्या देशामध्ये प्रतिदिन, प्रत्येक तासाला कुठेनाकुठे अबला स्त्री वासनांधांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. शाळा महाविद्यालयांत नीती आनि नैतिक मूल्ये रुजवली जात नसल्याने गल्लीपासून दिल्लीपर्यंत प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराने आपली पाळेमुळे घट्ट रोवली आहेत. ही स्थिती बदलायची असेल तर मानवासह समस्त प्राणिमत्रांची काळजी घेणारे धर्मासह राष्ट्राला सर्वोपरी मानणारे रामराज्य अर्थात 'सनातन राष्ट्र' स्थापन करावे लागेल. याच उदात्त हेतूने राजधानी दिल्लीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आलेले आहे. भारत ही शूरवीरांच्या भूमी आहे, आपल्या अफाट शौर्याने शत्रूला नामोहरम करणारे पराक्रमी राजे, शूरवीर मावळे आणि साक्षात शक्तीचे रूप असणाऱ्या विरांगना यांनी युद्धभूमीत वापरलेल्या शस्त्रांचे प्रदर्शन या ठिकाणी भरवण्यात येणार आहे. भारतीय संस्कृती, कला आणि अध्यात्म यांचे दर्शन घडवणाऱ्या कलाकृतींचे प्रदर्शनही या ठिकाणी पाहायला मिळणार आहे. राष्ट्र, धर्म आणि संस्कृती यांवर प्रेम करणाऱ्या आणि त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येकाने 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चा प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन प्रक्षेपणाच्या माध्यमातून लाभ घ्यायलाच हवा

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## रुद्र रातोळीकरची पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये दमदार कामगिरी

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०९, देगलूर (नांदेड) :** देगलूर येथील पोतदार इंग्लिश स्कूल मध्ये पाचवी वर्गात शिकत असलेला दहा वर्षांचा रुद्र ज्ञानेश्वर रातोळीकर नंबर (बि.आय.बि. नं..२१९९५) यानी रविवारी पुणे येथे पार पडलेल्या इंटरनॅशनल मॅरेथॉनमध्ये २१ किलोमीटर हाफ-मॅरेथॉनचे अंतर १५५ मि निटं (२:३५) मिनिटात यशस्वीरीत्या पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. लहान वयात इतक्या मोठ्या अंतराची शर्यत पूर्ण करून नांदेड जिल्हयाचे नाव लौकिक केल्यामुळे रुद्रचे सर्वत्र कौतुक होत आहे. नायगाव तालुक्यातील रातोळी येथील भुमीपुत्र तथा महसुल अधिकारी ज्ञानेश्वर रातोळीकर यांचे पुत्र रुद्र तसा अभ्यासात हुशार आहे. यामुळे त्याला शिक्षणा बरोबर चांगले संस्कार मिळाले याबरोबर त्याला खेळाची सुध्दा आवड असल्यामुळे शर्यतीदरम्यान रुद्रने विलक्षण जिद्द, सहनशक्ती आणि धावण्यावरील प्रेम दाखवले. मार्गावर प्रेक्षकांनी त्याला मोठ्या उत्साहात दाद दिली. शर्यत पूर्ण केल्यानंतर रुद्रने आनंद व्यक्त करताना सांगितले की, मला धावणे खूप आवडते. मोठ्या धावपटूंना पाहून मीही मोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन धावण्याचे स्वप्न पाहतो.असे दैनिक अक्षराजशी बोलताना तो म्हणाला. रुद्रच्या पालकांनी आणि प्रशिक्षकांनी त्याच्या या शिस्तीचे, मेहनतीचे आणि सातत्याचे कौतुक केले. शर्यत आयोजकांनीही इतक्या लहान वयात २१ कि.मी.पूर्ण केल्याबद्दल त्याचा विशेष गौरव केला.




रुद्रच्या या उल्लेखनिय कामगिरीमुळे पुण्यात तसेच जिल्ह्यातील इतर बालधावपटूंमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे. योग्य मार्गदर्शन आणि सराव मिळाल्यास रुद्र भविष्यात जिल्हा व राज्यस्तरावर नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.या त्याच्या यशा बदल मामा निखील पा. कोठारे व तलाठी सतीष देशमुख,औदुबंर वाडीकर, शिवाजी तोत्रे, महेश पदाजी, मारोती भुताळे, सदाशिव बोयेवार, शेशीकांत तेलंग, अमजत पठाण, शिओम पाटील, पत्रकार बांधवसह आदीने अभिनंदन केले आहेत.

## रास्त मागण्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधणार : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर (नागपूर) :** हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी पासून विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या उपोषण आंदोलनाला आ. किशोर जोरगेवार यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्या असून अधिवेशनात सदर विषय उपस्थित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कंत्राटी कर्मचारी, सुरक्षा रक्षक, अनुकंपाधारक प्रकरणे तसेच शिक्षकांच्या समस्या याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनेक संघटना एकत्रितपणे उपोषणस्थळी बसल्या आहेत. नियुक्ती प्रक्रिया, वेतननिर्णय, सेवानिवृत्ती वय वाढ, अनुकंपाधारक नियुक्ती तसेच प्रलंबित भरती या प्रश्नावर तोडगा निघावा, या मागणीसाठी मोठ्या संख्येने कामगार आणि कर्मचारी उपस्थित होते. उपोषणस्थळी पोहोचल्यावर आ. जोरगेवार यांनी सर्व प्रतिनिधींशी संवाद साधला.



त्यांनी प्रत्येक संघटनेचे निवेदन स्वीकारले आणि त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. या समस्यांचे गांभीर्य समजून घेत त्यांनी सभागृहात हे प्रश्न दृढपणे मांडले जातील आणि सरकारच्या निदर्शनासही आणले जातील, असे आश्वस्त केले. या सर्व मागण्या जन जीवनाशी संबंधित आहेत. योग्य निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. उपोषणकर्त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करीन, असे आ. जोरगेवार यांनी सांगितले. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, अधिवेशनात या विषयांवर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांशीही संवाद साधला जाणार आहे.

## शिक्षक परिषदेने विविध मागण्या/समस्या संदर्भात मुख्यमंत्री कार्यालयाचे लक्ष वेधले

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग चे वतीने राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विविध समस्या/मागण्या संदर्भात मुख्यमंत्री कार्यालयाचे लक्ष वेधले आहे. परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळात विलास बोबडे, अमोल देठे, विलास खाडे, राजेंद्र पांडे यांचा समावेश होता. निवेदन सोमवार दिनांक ८ डिसेंबर २०२५ ला नागपूर येथे निवेदन देण्यात आले.

तमसो मा ज्योतिर्गमय
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद
प्राथमिक विभाग
साद तुमची...साथ आमची...

निवेदनाचे अनुषंगाने मुख्यमंत्री सचिवालयाचे सचिव विद्याधर महाले, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव समीर सावंत, लेखा व कोषागार सहसंचालक ज्योती भोंडे आदींची भेट घेण्यात आली. दरम्यान प्राथमिक शिक्षकांच्या विविध समस्या/मागण्या संदर्भात मुख्यमंत्री यांनी तपासून कार्यवाही करण्याचे संबंधितांना निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग चे निवेदनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे ऑनलाईन कामकाजासंदर्भात शाळांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपकरणे उपलब्ध करून देऊन स्वतंत्र कर्मचारी नेमणे किंवा ग्रामपंचायत डाटा एन्ट्री ऑपरेटरांकडून शाळांची ऑनलाईन कामे करणे, प्राथमिक शिक्षकांना पदस्थापना झालेल्या मूळ शाळेतून अन्य शाळेत/कार्यालयात विविध शैक्षणिक/अशैक्षणिक कामासाठी नियुक्त करण्यात येऊ नये, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची विज बिल ग्रामपंचायत निधीतून भरणे किंवा विज बिलांसाठी स्वतंत्र तरतूद करणे, प्राथमिक शिक्षकांची डीसीपीएस अंतर्गत कपात झालेली रक्कम जीपीएफ मध्ये वळती करण्यात यावी, जिल्हा परिषद चंद्रपूर मधील प्राथमिक शिक्षकांची एकस्तर थकबाकी अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करणे आदींसह विविध समस्या/मागण्या यांचा सामावेश होता.

## जवान गोकुळ वाळके यांना अखेरचा निरोप ; अयोध्येमध्ये कर्तव्य बजावताना वीरमरण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** तालुक्यातील चांभुर्डी गावचे भूमिपुत्र आणि मराठा लाईट इन्फंट्री युनिट ५ मधील कार्यरत असलेले हवालदार गोकुळ नागेश वाळके (वय ३५) हे अयोध्या (उत्तर प्रदेश) येथे कर्तव्य बजावत असताना भुरळ येऊन पडल्याने डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने शुक्रवारी (दि.५ डिसेंबर) रोजी त्यांना वीरमरण आले. अल्पवयातच देशसेवेसाठी जीवन वाहिलेल्या या जवानाच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

वाळके हे पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे रहात असताना १४ वर्षांपूर्वी मराठा युनिट पाचमध्ये भरती झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी सोनाली वाळके,आई- वडील तसेच दोन लहान मुली आरुषी ( ११ वर्षे) आणि त्रिशा (४ वर्षे) एक बहिण असा परिवार आहे. सोमवार (दि. ८) सकाळी त्यांच्या मुळगावी चांभुर्डी येथे अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी शहीद जवान गोकुळ वाळके अमर राहो, भारत माता की जय,जय जवान जय किसान अशा घोषणांनी परिसर दुमदूमून गेला. सकाळी ११ वाजता त्यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. अंत्ययात्रेत नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.






शासकीय इतमामात पार पडलेल्या अंत्यसंस्कारावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, डीवायएसपी लोखंडे, कॅप्टन ज्ञानदेव उघडे, बाळासाहेब गुंजाळ, लबडे व सुभेदार प्रकाश लगड, वैभव शेटे, रावसाहेब कडूस, पोलीस निरीक्षक सोनलकर, सैनिकी त्रिदल संघटनेचे अध्यक्ष संदीप सांगळे, श्रीनिवास नाईक, संतोष ढगे, निलेश ढगे , माजी सरपंच बाबुराव ढगे, संजय शेळके, सरपंच वैशाली पुरी, पोलीस पाटील कल्याण उधार तसेच पंचक्रोशीतील आजी माजीसैनिक उपस्थित होते.

## अवैधरित्या गोवंश वाहतुक २० जनावरांची सुटका ; अंदाजे २४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा च्या पथकाला ८ डिसेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन हद्दीत २ पिकअप वाहने थांबवून पथकाने पंचासमक्ष तपासणी केली असता, त्यामध्ये एकूण ६ नग बैलांची अवैधरित्या वाहतूक करून कत्तलीसाठी नेत असताना मिळून आले. या दोन्ही वाहन चालकांकडे विचारपूस केली, तेव्हा त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी जावून खात्री केल्यानंतर दोन्ही ठिकाणांवर एकूण १४ गोवंशीय जनावरे (बैल) बांधून ठेवलेले मिळून आले.

दरम्यान आरोपींच्या ताब्यातून एकूण २० जनावरे किंमत अंदाजे ६ लाख आणि २ पिकअप वाहने किमत अंदाजे १८ लाख, असा एकूण २४ लाखांचा माल मिळून आला. यावरून आरोपी मिलींद जितेंद्र कोवे वयवर्ष २० रा. उदापुर ब्रम्हपुरी, अफसर अली सैय्यद वय वर्ष ३३ रा. ब्रम्हपुरी आणि पाहिजे असलेला आरोपी पहेलवार रा. ब्रम्हपुरी,यांच्याविरुध्द ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन येथे संबंधीत कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास ब्रम्हपुरी पोलीस करीत आहेत.



सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे चे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोउपनि. संतोष निंभोरकर, पोहवा.जयंत चुनारकर, पोअं. अजीत शेंडे, नितेश महात्मे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

## पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी - तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०९, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील पदवीधर मतदारांची प्रारूप यादी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली असुन यादीत नाव नसलेल्या सर्व पदवीधर मतदारांनी आपल्या नावाची नोंदणी यादीत करावी, असे आवाहन तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी केले आहे.

पालम तालुक्यातील तहसील कार्यालयात १ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारीत औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची यादी नव्याने तयार करण्यात आली असून प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची सुचना व प्रारुप मतदार यादी बुधवार ३ डिसेंबर रोजी पदनिदेर्शीत ठिकाणच्या मतदान केंद्रावर तसेच महूसल मंडळ बनवस, चाटोरी, रावराजूर, पेठाशिवणी आदी ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली आहे. ही मतदार यादी पाहण्यासाठी पालम तहसिल कार्यालयात तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्या कक्षासह निवडणूक विभागाच्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

पदवीधर मतदार संघाची मतदार यादी तयार करण्यासाठी अर्हता दिनांकाच्या आधारे मतदार यादीत नाव समाविष्ठ करण्यासाठी किंवा समाविष्ठ असलेल्या नावाबाबत किंवा एखाद्या नोंदीच्या तपशीला संदर्भात कोणतीही दावे व हरकती असल्यास ३ ते १८ डिसेंबर या कालावधीत नमुना १८, ७ किंवा ८ क्रमांकाच्या फार्ममध्ये तहसिल कार्यालय पालम कार्यालयातील पदनिदेर्शीत ठिकाणचे मतदान केंद्र तहसील कार्यालय या ठिकाणी संबंधित अधिकारी यांच्याकडे दाखल करावे, तसेच दि. १ नोव्हेंबर २०२२ रोजी पूर्वी पदवी प्रमाणपत्र प्राप्त करणाऱ्या पदवी धारकांनी अद्यापपर्यंत नावनोंदणी केली नसल्यास या पदवी धारकांनी विहीत नमूना नं. १८ सोबत पदवी प्रमाणपत्र, मार्कमेमो, पासपोर्ट फोटो, मतदान ओळखपत्र, रहीवासी च्या पुराव्यासह ऑफलाईन तसेच

https://mahaelection.gov.in या लींक वर ऑनलाईन नोंदणी करावी, असे अवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी जिवराज डापकर, तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार विनोद पवार आदींनी केले आहे.



## कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करू नये याकरिता ११ जानेवारीला प्रात कार्यालयावर मोर्चा

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०९, पेण (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात ५० शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे मुंगोशी, कुरनाड, आनंदनगर, काळेशी, कुहिरे आणि पाहीरमाळ सहा जिल्हा परिषद शाळांना सरकारने शिक्षक दिलेले नाहीत तसेच रोडे जिल्हा परिषद शाळा पहिली ते सातवीपर्यंत असून पटसंख्या १०६ आहे पण या शाळेला फक्त तीन शिक्षक दिलेले आहेत त्यामुळे पहिली ते सातवी वर्गातील १०६ मुलांना तीन शिक्षक शिकवणार कसे? तसेच वढाव, वडखळ, जावळीसह अशा अनेक शाळांची ही अवस्था आहे जिथे पटसंख्या असूनही शिक्षकांची संख्या अपुरी आहे. सरकारने ७ ऑक्टोबर २०२५ रोजी एक ते पाच पटसंख्याच्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पेण तालुक्यातील वरप, झापडी, गौळावाडीसह २९ शाळा बंद होणार आहेत त्यामुळे गरिबांची मुले शिकणार कशी? अशा विविध मागण्यांसाठी ११ जानेवारीला प्रात कार्यालया समोर आंदोलन करणार असल्याचे निवेदन सत्यशोधक सर्वोदय संघटनेकडून तसे प्रांत अधिकारी यांना देण्यात आले आहे. महाविद्यालयाला प्राध्यापक नाही, आश्रम शाळेतला शिक्षक नाही, परझड झालेल्या शाळा, शौचालय नाही, स्वच्छता गृह नाही, अपुरे शिक्षक, विज नाही, शाळेला कॉम्प्युटर नाही, बेंचेस नाही, शुद्ध पाणी नाही, ढासळलेली शैक्षणिक गुणवत्ता अशा परिस्थितीमध्ये सरकारी शाळा आहेत.



शिक्षणाच्या खाजगी कारणामुळे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मुळे रायगड जिल्ह्यातील ३०० पेक्षा अधिक शाळा बंद असून महाराष्ट्रातील सुमारे १० हजार पेक्षा शाळा बंद झालेल्या आहेत. शिक्षणाच्या खाजगीकारणामुळे पहिली आणि दुसरीच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च ३५ ते ४० हजार रुपये, अकरावी बारावीचा खर्च २ ते ३ लाख रुपये, एमबीएचा खर्च ५ ते ७ लाख रुपये, इंजिनिअरिंगचा खर्च १५ ते १७ लाख रुपये आणि डॉक्टर होण्यासाठी खर्च ७० ते ८० लाख रुपये येत आहे. त्यामुळे गरिबांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकली गेलेली आहेत. अंगणवाडी ते पदव्युत्तर डॉक्टर इंजिनियर होईपर्यंत मोफत शिक्षण मिळावे, शिक्षक आणि प्राध्यापकांची भरती करावी, संच मान्यता जीआर रद्द करावे, शाळा बंद करू नये अशा अनेक मागण्या घेऊन शिक्षक, विद्यार्थी, पालक यांचा ११ डिसेंबर २०२५ रोजी उपविभागीय कार्यालयात पेण येथे मोर्चा काढून शिक्षण हक्क सत्याग्रह करणार असल्याचे निवेदन प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांना देण्यात आले आहे.

## पालम येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०९, पालम (परभणी) :** पालम तालुका विधी सेवा समिती आणि बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १३ डिसेंबर रोजी पालम येथील न्यायालयाच्या परिसरात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीद्वारे नागरिकांना आपापली प्रकरणे सामंजस्याने आणि जलदगतीने निकाली काढता येणार आहेत. या राष्ट्रीय लोक अदालतीचा मुख्य उद्देश दोन्ही पक्षांच्या सहमतीने व कमी वेळेत, विना-खर्च न्याय मिळवून देणे हा आहे.

या अदालतीमध्ये बँकांचे दावे, कर्ज वसुली तसेच वित्तीय संस्थांशी संबंधित प्रलंबित प्रकरणे. एन.आय. ॲक्टनुसार कलम १३८ अंतर्गत प्रकरणे चेक बाउन्स संबंधित प्रकरणे, वादपूर्व खटले, न्यायालयात दाखल होण्यापूर्वीचे असलेले तडजोडी योग्य वाद मांडता येणार आहेत. या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या अंतर्गत नागरिकांनी आपापली प्रलंबित प्रकरण निकाली काढावीत आणि न्याय मिळवावा असे आवाहन पालम तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश मनिषा पाटील यांनी केले आहे.

# श्री संताजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, सातारा :** श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने तेली सम ाजाचे दैवत श्री संताजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी श्री संताजी महाराज यांचे प्रतिमेला नितीन तुपे आरपीआय साताऱ्याचे अध्यक्ष, संघटनेचे जिल्हा सम न्वयक पोपटराव भोज व सातारा तालुका समन्वयक शिवाजीराव गंधाले, मोरे सर, सामाजिक कार्यकर्ते, सातारा तालुका अध्यक्ष अनिल किरवे व संतोष दळवी सहाय्यक तहसीलदार सातारा यांच्या हस्ते पुष्प वाहण्यात आली व विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संघटनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



श्री संताजी महाराज यांचे पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन करताना आरपीआय संघटनेचे अध्यक्ष नितीन तुपे म्हणाले, संताजी महाराजांचे विचार समाजापर्यंत पोचणे गरजेचे आहे. संताजी महाराज होते म्हणून तुकाराम महाराजांचा एवढा ठेवा समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. खरे तर ओबीसी समाज व आम्ही बंधू बंधू आहोत आणि खऱ्या अर्थाने आज ओबीसी समाज आणि आमची ताकद एकच राहिल्यास समाजामध्ये वेगळ्या प्रकारची क्रांति होईल. यावेळी सहाय्यक तहसीलदार संतोष दळवी यांनी आपले विचार मांडताना म्हणाले, आज समाजाला खऱ्या अर्थाने बदलणे गरजेचे आहे. संताजी महाराजांचे विचार खऱ्या अर्थाने कृतीमध्ये येण्याची गरज आहे. तरी आम्ही आज मेळावे आणि गंगापूजन याच्या मध्येच अडकून पडलेला आहोत. आज ज्यांना आम्ही मागास म्हणतो ते आमच्यापासून कितीतरी पुढे निघून गेलेले आहेत. ओबीसी समाजाला खऱ्या अर्थाने याचा विचार केला पाहिजे व आपल्यामध्ये बदल घडवून आणले पाहिजेत.

संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी व समाज बांधव यांना संबोधित करताना संघटनेचे अध्यक्ष राम पडघे म्हणाले, संघटनेमार्फत श्री संताजी महाराजांचे स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी आरपीआयचे अध्यक्ष नितीन तुपे या ठिकाणी हजर राहिले व त्यांनी स्वतः पुष्प वाहून संताजी महाराजांच्या स्मृतीस अभिवादन केले हे खरे तर फार मोठ्या बदलाचे संकेत आहेत. संताजी महाराजांचे विचार त्यांनी ज्या प्रकारे आता मांडले हे पाहून निश्चित समाधान वाटले की, संताजी महाराज आज सर्व समाजाला ज्ञात होत आहेत व त्यांचे विचार सर्वांना पटत आहेत. संताजी महाराजांचे आशीर्वादाने संघटनेचे काम अत्यंत उत्कृष्टपणे सुरू असून संघटनेमार्फत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

नुकताच महाबळेश्वर तालुक्यातील अत्यंत दुर्गम व मागास जनजातीला कौटुंबिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे निमित्ताने सर्व समाजातून संघटनेचे अभिनंदन करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील तेली सम ाजाची कौटुंबिक माहिती एकत्रित करून करण्याची फार मोठी मोहीम संघटनेमार्फत राबविण्यात येत आहे. आज समाजापुढे असलेल्या गंभीर प्रश्न मुला मुलींचे लग्न जुळवणे हा आहे. यासाठी संघटनेमार्फत ही माहिती एकत्र करण्याचा फार म ोठा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याच्यासाठी संघटनेने स्वतंत्र एप्लीकेशन तयार केलेले असून त्याची लिंक गरजू बांधवांना पाठवण्यात येत असून त्या अन्वये माहिती एकत्रित करून ज्या बांधवांना त्याच्या आवश्यकता असेल त्यांना त्याचा पुरवठा केला जात आहे. आज ह्याला समाजातून अत्यंत मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून अशा प्रकारचा कार्यक्रम यापूर्वी सुरू करायला हवा असे अनेक अभ्यासू समाजबांधव आपले मत व्यक्त करत आहेत. यावेळी संघटनेच्या भविष्यकालीन कार्यक्रमाविषयी चर्चा होऊन या अत्यंत पवित्र दिनी जयंती कार्यक्रम अत्यंत उत्साहाने पार पाडून आजची सभा पूर्ण करण्यात आली.

यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष माननीय विठ्ठलराव शिरसागर प्रदीप देशमाने सातारा तालुका अध्यक्ष अनिल किरवे सातारा जिल्हा समन्वयक पोपटराव भोज सातारा तालुका समन्वयक शिवाजीराव गंधाले, संतोष दळवी, आर पी आय चे अध्यक्ष नितीन तुपे सामाजिक कार्यकर्ते मोरे सर व संघटनेचे अध्यक्ष राम पडघे उपस्थित होते. सर्व जमलेल्या समाज बांधव पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांचे आभार माननीय प्रदीप देशमाने यांनी म ानले व कार्यक्रम समाप्त केला.

# दिवा शहरातील दहशत रोखण्यासाठी मनसेकडून 'हेल्पलाइन'

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील वाढत्या गुन्हेगारी,गर्दुल्ले आणि टपोरी मुलांचा उपद्रव, दहशत रोखण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शहर अध्यक्ष तुषार पाटील यांच्या नेतृत्वाखाली आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. शहरातील सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी मनसे दिवा शहराच्या वतीने नागरिकांना एक जाहीर आवाहन करण्यात आले असून, तक्रारींसाठी खास व्हॉट्सॲप क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

चौकट: नेमकी समस्या काय?

दिवा शहरातील शाळा, सोसायट्यांचा परिसर, मैदाने, विविध चौक, गल्ली-बोळ आणि रेल्वे स्थानक परिसरात असामाजिक तत्त्वांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी दारुडे, गर्दुल्ले आणि नशेखोर उघड्यावर दारू पिणे, गांजा ओढणे असे प्रकार करत आहेत. याशिवाय, मुलींची किंवा महिलांची छेड काढण्याचे प्रकारही घडत असल्याने सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याबाबत आता मनसेनेरस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे.

**मनसेचे नागरिकांना आवाहन !**

या प्रकारांना आळा घालण्यासाठी मनसेने पुढाकार घेतला आहे. आपल्या परिसरात असे गैरप्रकार सुरू असल्यास नागरिकांनी त्याबाबतची माहिती मनसेला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित ठिकाणाची माहिती, पत्ता आणि शक्य असल्यास गुगल लोकेशन सह फोटो. ही सर्व माहिती ९९८७३७८३४३ या व्हॉट्सॲप क्रम ांकावर पाठवावी असे आवाहन मनसेने केले आहे. अनेकदा नागरिक भीतीपोटी तक्रार करण्यास धजावत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन, माहिती पाठवणाऱ्या व्यक्तीची ओळख आणि नाव पूर्णपणे गुप्त ठेवले जाईल, असे आश्वासन मनसेतर्फे देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे दिव्यातील असामाजिक तत्त्वांवर वचक बसेल आणि परिसर सुरक्षित होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# आजी-माजी शिक्षक, विद्यार्थी, सरपंच व समाजरत्नांचा कृतज्ञता सन्मान सोहळा

**अक्षराज : विकास दळवी**

**दि. ०८, सातारा :** म्हाते खुर्द, ता. जावली ¯ मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्राथमि क शाळा म्हाते खुर्द येथे गावाच्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या विविध समाजशील घटकांचा भव्य कृतज्ञता सन्मान सोहळा उत्साहात संपन्न झाला.



गावातील ज्ञानज्योती प्रज्ज्वलित करणाऱ्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सर्व शिक्षकांचा मानपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला. शाळेची घडण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शैक्षणिक उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाची ग्रामस्थांनी कृतज्ञतेने दखल घेतली.

ग्रामपंचायत कारभार बळकट करण्यासाठी योगदान देणाऱ्या आजी-माजी सरपंचांना शाल-पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच तालुक्यातील पत्रकार, कर्तृत्ववान शेतकरी, विधवा महिला, माजी विद्यार्थी, नवयुग मंडळ अध्यक्ष, नेहरू युवा मंडळ,नवयुग पतसंस्थेचे अध्यक्ष आदी समाजसेवी व्यक्तिम त्वांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याबद्दल गावकऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाला गावातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवा तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामसभेतील एकात्मता, परस्पर सन्मान आणि समाजाच्या सर्व घटकांना जोडणारा हा उपक्रम सर्वांच्याच कौतुकास पात्र ठरला असल्याची भावना म्हाते गावचे सुपुत्र पत्रकार विकास दळवी यांनी बोलून दाखवली.या कार्यक्रमास सहाय्यक बीडीओ राम जगताप, विस्तार अधिकारी गोविंद माने यांनी मार्गदर्शन केले. कर संकलन, अँप डाऊनलोड करणे, अवयव दान फार्म भरणे, अँग्री स्टॅक काढणे ही कामे अभियानाच्या माध्यमातून पुर्णत्वास केल्याची माहिती सरपंच राजाराम दळवी यांनी दिली.

# आज खापरखेड्यात आ. श्रीजया चव्हाण व डॉ. आशिष देशमुख यांचा जंगी सत्कार

## * शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलला देणार सदिच्छा भेट

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** राज्याचे माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांचा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या त्यांच्या नात आमदार श्रीजया अशोक चव्हाण आणि आमदार डॉ. आशिष देशमुख यांची आज १० डिसेंबर बुधवारला वीज केंद्राच्या प्रकाशनगर येथील शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूल आणि शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा सदिच्छा भेट आयोजित आहे.

या निमित्ताने मराविमं संस्था व शाळा महाविद्यालयाच्या वतीने उभय नेत्यांचा जंगी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. बुधवारला दुपारी ३.३० वाजता हा भव्य कार्यक्रम पार पडणार आहे. स्व. शंकरराव चव्हाण यांनी म हाराष्ट्राच्या विकासात दिलेल्या योगदानाचा आणि त्यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा जपणाऱ्या या संस्थेत त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि लोकप्रतिनिधी भेट देत असल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. सत्कार समारंभ कार्यक्रम





ाला मुख्य अभियंता गिरीश कुमरवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी संस्थेचे सचिव ईश्वर राऊत, संध्या ठाकरे, यामिनी घोडमारे, प्रशांत जालंदर, गणेश चिखले, किशोर बक्सरिया, सुनील जालंदर, उमेश राऊत, प्रतिभा खन्नाडे, संजय चिखले, पुष्पा जथे यांच्यासह शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे आणि मोनाली सुरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# थोडक्यात

# घाणव येथे महा मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण :** घाणव ता. पाटण येथे परिवर्तन नवतरून मित्र मंडळ घाणव या संस्थेने रविवार दि.०७ डिसेंबर २०२५ रोजी . अरविंद पाटील, यांच्या संकल्पनेतुन घाणव गावामध्ये खुल्या गटामध्ये ५ कि.मी. अंतर मॅरेथॉनचे आयोजन केले होते. या स्पर्धे मध्ये शालेय विधार्थी-विद्यार्थीनी घाणव गावातील तरूण, प्रोढ युवक, नागरीकांचा उस्युर्त प्रतिसात लाभला.

या स्पर्धेत बक्षीसा करिता पुरुष गट व महिला गट असे दोन गट तयार करण्यात आले होते, पुरुष गटामध्ये प्रथम क्रमांक रोहीत चिमाजी सुर्यवंशी, व्दितीय क्रमांक नवनाथ पंढरीनाथ घाडगे, त्रितीय क्रमांक ओंकार भावूसाहेब घाडगे तर महिलामध्ये प्रथम क्रमांक सीमा संदीप शिंदे, व्दितीय क्रमांक जया सुदाम पवार, आणि त्रितीय क्रमांक संजीवणी संतोष पवार यांना बंक्षीसे प्राप्त झाली, सदर कार्यक्रमासाठी सातारा येथील झुब्बा डान्स च्या प्रशिक्षीका दिपाली बहादूले व त्यांच्या सोबतच्या अन्य युवतींनी या स्पर्धेला वॉर्मअप, स्ट्रेचिंग चे प्रकार गाण्यांच्या माध्यमातुन सादर केले त्यामुळे या स्पर्धेला रंगत आली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे मार्गदर्शक अरविंद पाटील, दिनकरभावु सुर्यवंशी, कृष्णत सुर्यवंशी, रामचंद्र सुर्यवंशी, संस्थेचे अध्यक्ष . अशोक पाटील, सचिव रामचंद्र कदम व इतर सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले, या स्पर्धेमध्ये घाणव या गावातील प्रथम पोलिस खत्यात भरती होणा-या सौ. पुजा जगताप-पाटील तसेच पोलीस अधिकारी . संभाजीराव पाटणकर यांनी युवकांना धावण्याचे महत्व व फायदे या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. ही स्पर्धा पाटण तालुक्यात ग्रामीण भागातील पहिलीच स्पर्धा भरविण्याचा मान घाणव गावाने मिळवला या साठी समाजातुन या स्पर्धा राबविणा-या आयोजकांचे कौतुक होत आहे. या स्पर्धे साठी श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था पाटण, जे. के. ट्रान्सपोर्ट मुंबई, अरविंद पाटील, डिगे क्लासेस बदलापुर मुंबई, यशवंत चव्हाण, अमित पेपर वर्कस्, सातारा, धर्मा चव्हाण, रफिक आतार, बापू परमार इत्यांदीचे आर्थिक सहकार्य लाभले.

# पाडळी तर्फे कान्हुर शाळेचा बाल आनंद मेळावा उत्साहात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** भाजी घ्या भाजी ताजी ताजी भाजी, टवटवीत फळे अशी हाक देत अशी हाक देत आठवडी बाजाराच्या उत्साही वातावरणा प्रमाणे पारनेर तालुक्यातील पाडळी तर्फे कान्हुर येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांचा बालआनंद बाजार नुकताच पाडळी तर्फे कान्हुर गावातील मंदिराच्या आवारात भरविण्यात आला होता. चिमुकल्यांच्या बाल आनंदी बाजार अक्षरशः रंगतदार मेळावाच ठरला. व्यवहारज्ञानाचे धडे गिरवणाऱ्या चिमुरड्यांनी बाजारपेठ गजबजून टाकली होती. बाजाराला ग्रामस्थ व पालकांचा प्रतिसाद मिळाला.



या आनंदी बाजाराचा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य, विक्री - खरेदीची प्रक्रिया, पैशांचे गणित व टीम वर्क विकसित करणे हा उद्देश असल्याचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन दावभट व मुख्याध्यापक संजय सिनारे यांनी सांगितले.

मेथी, भोपळा, वांगी, टोमॅटो, रताळी,पेरू, लिंबू,पपई, गावरान बेरे आदी विविध भाज्यांची लहानग्यांनी ग्राहकांशी संवाद साधत भाव केला. वस्तुंची माहिती दिली. विद्यार्थी बालकांनी विविध वस्तूंसह खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते.

केंद्रप्रमुख बाळासाहेब फंड, सरपंच इंदू सिनारे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष स्वाती सिनारे, गणेश सुंबे, योगेश दावभट, उपसरपंच अंबिका दावभट,ठकराम सिनारे,भाऊ सिनारे, विजय सुंबे, सर्जेराव दावभट, शंकर सिनारे उपस्थित होते.

बाल आनंद मेळाव्यासाठी मुख्याध्यापक संजय सिनारे,संपत भागवत, रविंद्र शिंदे, संजय शेळके, यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन संपत भागवत यांनी केले.

# श्री दत्त मंदिरात पालखी सोहळा; दरवर्षी करणार पालखी उत्सव



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील साधारण इ.स. १८०० च्या आसपास स्थापित, औदुंबर कल्पवृक्ष छायेखाली असलेले अतीप्राचीन श्री गुरुदेव दत्त मंदिर येथे श्री दत्त मंदिरात श्री दत्त जयंती सोहळा उत्साहात संपन्न झाला. या जयंती सोहळ्या निमित्त येथे भव्य पालखी आयोजित करण्यात आली होता.

पहिल्यांदाच हा पालखी सोहळा आयोजित करण्यात आला, जो गाणगापूर मध्ये होतो तसाच पालखी सोहळा विंचूर मध्ये आयोजित करण्यात आला. नेमकी याच वर्षी नृसिंह सरस्वती यांची मूर्ती पुजारी महेश जोशी गुरुजी यांच्या घरी आल्याने दत्तप्रचिती होवुन पालखी सोहळा पार पडला. पुढे सुद्धा हि परंपरा सुरू राहिल असे गुरुजी लोकांनी सांगितले. महेश रमेश जोशी गुरुजी तसेच त्यांचे सहकारी धोंडीराम शंकपाल यांनी पालखी तसेच महाप्रसादाचे यशस्वी नियोजन केले होते. पालखी सोहळ्यासाठी कृष्णा गुरुजी जोशी यांनी पुढाकार घेऊन विविध भजने म्हंटली. लासलगाव येथील श्री दत्ताच्या पालखीचे भोई म्हणुन प्रसिद्ध असलेले ऋषीकेश जोशी गुरूजी, संदीप दिक्षीत गुरूजी यांनी इथेही आपली सेवा पार पाडली. पालखीची सजावट श्रीपाद खोत, चेतन विसपूते, कल्पेश कासार यांनी केली, तसेच त्यांनी एकाहुन एक सुंदर भजन म्हणत पालखीची शोभा वाढवली. या सोहळ्यासाठी सतीश कांकरिया, राजाभाऊ पोतले, प्रसिद्ध व्यापारी सोमनाथ शिरसाट, परदेशी परिवार, मालपाणी परिवार यांचे सहकार्य लाभले. पालखी नंतर शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.